# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- ३१९** **दिनांक :-१७/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. दि.१०/१०/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी- १०.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५४ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१०/१०/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी- १०.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५४ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१०/१०/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी- १०.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.५४ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-३२०** **दिनांक :- १७/१०/२०२५**

**वाचा** :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मा.व्य.वि./२०६६/२०२५-२६ दि. १४/१०/२०२५

३. मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचा दि.१९/०९/२०२५ चा अभिप्राय.

४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.३०/०९/२०२५ चा अभिप्राय.

५. उपायुक्त यांचा दि.२५/०९/२०२५ चा अभिप्राय.

६. आयुक्त यांचा दि.२५/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** मनपा मालकीची सि.सं.नं.१९३७ (जुनी सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर एक वर्षा करीता वाहनतळ चालविणेस देणे कामी अभिकर्ता यांचे कडून प्राप्त झालेले देकार रक्कम स्विकारणे बाबत.

---

वाचा क्र.१ व मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मालकीची सि.स.नं. १९३७ ब,क,फ (जुने सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर वाहनतळ चालविणेस देणे कामी रक्कम रुपये २,८०,५००/- मात्र देकार रक्कमेवर वाहनतळ अभिकर्ता मार्फत चालविणे संदर्भात फेर दरपत्रक निविदा आयुक्त यांच्या दि.०९/०५/२०२५ रोजीच्या मान्यतेने निविदा सूचना क्र.२/२०२५-२६/दिनांक ०१/०७/२०२५ नुसार फेर निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदेत एकुण तीन निविदाधारक संस्था यांनी सहभाग नोंदविला होता. एकुण ०३ निविदाधारक यांच्या तांत्रीक दस्तावेजाची लिफाफा क्र.१ उपायुक्त यांच्या दि.१०/०७/२०२५ रोजीच्या मान्यतेने समक्ष उघडण्यात आले असता तांत्रीक दस्तावेजाची छानणी केली असता तीनही निविदाधारक यांचे लिफाफा क्र.१ मध्ये तांत्रीक दस्तावेज तसेच तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता तीन निविदाधारक यांच्या पैकी आदित्य मल्टि सर्विसेस व धनश्री स्वयंरोजगार सेवा संस्था या पात्र ठरल्या व निक्की स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था अपात्र ठरली आहे. आदित्य मल्टि सर्विसेस व धनश्री स्वयंरोजगार सेवा संस्था या पात्र संस्थांचे निविदा समितीच्या मान्यतेने देकार रक्कमेचा आर्थिक लिफाफा क्र.२ उपायुक्त यांच्या समक्ष उघडण्यात आले असता त्यात प्राप्त झालेले देकार रक्कम खालील प्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | आदित्य मल्टि सर्विसेस | २,८१,०००/- |
| २ | धनश्री स्वयंरोजगार सेवा संस्था | २,६५,०००/- |

महानगरपालिका मालकीची सि.स.नं. १९३७ ब,क,फ (जुने सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर वाहनतळ चालविणेस देणे कामी रक्कम रुपये २,८०,५००/- मात्र निविदा अंदाजित देकार रक्कमेचा अंतरभाव करता वरील तुलनात्मक तक्ता पाहता एकुण ०२ निविदाधारक पैकी आदित्य मल्टि सर्व्हिसेस यांनी निविदा अंदाजित देकार रक्कमेपेक्षा जास्त असल्याने देकार रक्कम रु.२,८१,०००/- प्राप्त झाले आहे. सदर देकार रक्कम स्विकारणेसाठी तसेच सदरचे देकार रक्कम स्विकारुन निविदाधारक आदित्य मल्टि सर्विसेस यांचेशी ज.म.न.पा च्या अटी-शर्तीची संविदा करुन कार्यादेश निर्गमित करणेस मान्यता मिळण्यासाठी मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:-३२१** **दिनांक :-१७/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विदयुत विभाग प्रमुख यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मनपा/विदयुत/२५५/२०२५-२६ दि. १५/१०/२०२५
३. विदयुत विभाग प्रमुख यांचा दि.०६/१०/२०२५ चा अभिप्राय.
४. शहर अभियंता यांचा दि.०८/१०/२०२५ चा अभिप्राय.
५. निविदा समितीचा दि.०७/१०/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** महानगरपालिका प्रशासकीय ईमारत व विद्युत युनिट ठिकाणी तांत्रिक कामे करणे करीता १ कनिष्ठ अभियंता व १० वायरमन हे बाह्यस्त्रोत पुरवठादार/मक्तेदार यांचेकडुन कुशल मनुष्यबळ पुरविणे.

---

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका प्रशासकीय ईमारत व विद्युत युनिट ठिकाणी तांत्रिक कामे करणे करीता १ कनिष्ठ अभियंता व १० वायरमन हे बाह्यस्त्रोत पुरवठादार/मक्तेदार यांचेकडुन कुशल मनुष्यबळ पुरविणे कामी महासभा ठराव क्रं.२८६ दि.१३/०६/२०२५ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. तरी सदर कामी शासनाचे htt ps:/mahatenders gov.in या संकेतस्थळावर ई निविदा सुचना क्रं. ११ प्रसिध्द करुन त्याबाबतचे माहितीपत्रक दै. पुण्यनगरी दि. ०८/०७/२०२५ रोजीचे वृत्तपत्रात प्रसिध्द करुन दर मागविणेत आले असता दि.०७/०७/०२५ ते दि. २१/०७/२०२५ पर्यंत ई निविदा फॉर्म विक्रीची मुदत देण्यात आलेली होती. मात्र विहित मुदतीत एकही ई निविदा प्राप्त झालेली नाही.

ई-निविदा स्पर्धात्मक होणेच्या दृष्टीने शासनाचे https:/mahatenders gov.in या संकेतस्थळावर फेर ई-निविदा सुचना (२nd call) क्रं.१२ प्रसिध्द करण्यात आली. त्याबाबतचे माहितीपत्रक दै.सामना दि.२६/०७/२०२५ रोजीचे वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आले. संगणकाद्वारे ई-निविदा भरणे करीता दि. २५/०७/२०२५ ते दि.०१/०८/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती.

सदर मुदतीत संगणकाद्वारे https:/mahatenders gov.in वर १) ओम एन्टरप्रायजेस,पुणे २) ओम साई असोसीएट,नागपुर या दोनही ई-निविदाधारकांचे ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. दोनही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं. १ सक्षम प्राधिकरण यांचे मान्यतेने उघडण्यात आले. त्यात आलेल्या दोनही ई-निविदाधारकांची फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता ई-निविदेत सहभागी असलेले दोनही ई-निविदाधारकांनी फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली नसल्याने ई-निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने दोनही ई-निविदाधारक यांना निविदा सादर करणेपुर्वीच्या दिनांकाची कागदपत्रे दोन दिवसात सादर करणेबाबत दि. १२/०८/२०२५ रोजी https:/mahatenders gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर दि. १५/०८/२०२५ रोजी दुपारी ५ वाजेपर्यंत Short Fall Document Submission करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार ई-निविदाधारक १) ओम एन्टरप्रायजेस,पुणे, २) ओम साई असोसीएट,नागपुर यांनी Short Fall द्वारे निविदा सादर करणेपुर्वीच्या दिनांकाची मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने दोनही ई-निविदाधारक सदर ई-निविदेकरीता अपात्र ठरत आहेत.

ई-निविदा स्पर्धात्मक होणेच्या दृष्टीने सदर फेर ई-निविदेस (२nd call) योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने फेर ई-निविदा (२nd call) रद्य करुन शासनाचे https:/mahatenders gov.in या संकेतस्थळावर फेर ई-निविदा सुचना क्रं. १३ (३rd call) प्रसिध्द करण्यात आली. त्याबाबतचे माहितीपत्रक दै. सकाळ दि.२१/०८/२०२५ रोजीचे वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आले. संगणकाद्वारे ई-निविदा भरणे करीता दि. २०/०८/२०२५ ते दि.२७/०८/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. विहित मुदतीत दोन ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदर मुदतीत संगणकाद्वारे https:/mahatenders gov.in वर १) ओम एन्टरप्रायजेस,पुणे २) मालगे एन्टरप्रायजेस,नागपुर या दोन ई-निविदाधारकांचे ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. दोनही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं. १ सक्षम प्राधिकरण यांचे मान्यतेने उघडण्यात आले. त्यात आलेल्या दोनही ई-निविदाधारकांची फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छाननी करण्यात आली.

| अ.क्रं. | ई-निविदाधारकाचे नांव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १ | ओम एन्टरप्रायजेस,पुणे | फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेली कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते सदर ई निविदेकरीता पात्र ठरत आहे. |

ई-निविदेत सहभागी असलेले ई-निविदाधारक मालगे एन्टरप्रायजेस,नागपुर यांनी फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली नाहीत. ई-निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने दुसरे ई-निविदाधारक मालगे एन्टरप्रायजेस, नागपुर यांना निविदा सादर करणेपुर्वीच्या दिनांकाची कागदपत्रे दोन दिवसात सादर करणेबाबत दि.१/०९/२०२५ रोजी https:/mahatenders gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर दि. ०३/०९/२०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत Short Fall Document Submission करणेबाबत कळविण्यात आलेले होते. मात्र मालगे एन्टरप्रायजेस,नागपुर यांनी Short Fall द्वारे मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने सदर ई-निविदेकरीता ते अपात्र ठरत आहेत.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रं. सीएसटी-२०१७/प्र.क्रं८/इमा-२ मंत्रालय मुंबई दि.२७/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील पृष्ठ क्रं. १६ मुद्दा क्रं. ४.३ वर प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही द्वितीय मागणी समजण्यात येईल. अशा मागणीनंतर जर परत एकाकी निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांबाबत निविदा उघडुन प्रचलित कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करावी. असे नमुद आहे.

प्राप्त ई निविदाधारक ओम एन्टरप्रायजेस,पुणे यांनी फोल्डर क्रं. १ मध्ये आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र ठरत असून त्यांचे फोल्डर क्रं. २ दरा बाबतचा लिफाफा उघडणेत आला असता त्यात आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्रं. | ई निविदाधारकाचे नांव | ई निविदा रक्कम | ई-निविदेत आलेले दर |
|---|---|---|---|
| १ | ओम एन्टरप्रायजेस,पुणे | प्रति कुशल ११ कामगार<br>प्रति दिवस रक्कम रु.१५५४३<br>(प्रति महिना रक्कम रु.४०४११८ x ११ महिने = रु.४४,४५,२९८/-) | अंदाजीत दरानुसार<br>प्रति कुशल ११ कामगार<br>प्रति दिवस रक्कम रु.१५५४३ |

| अपेक्षीत खर्च | | |
|---|---|---|
| प्रति दिवस | प्रति महिना २६ दिवस | ११ महिन्याकरीता |
| प्रति कुशल ११ कामगार x<br>प्रति दिवस रक्कम रु.१४१३<br>= रु. १५,५४३/- | प्रति कुशल ११ कामगार<br>प्रति दिवस रक्कम रु.१४१३ x २६ दिवस<br>= रु.४,०४,११८/- | प्रति कुशल ११ कामगार<br>प्रति महिना रक्कम रु.४०४११८ x ११ महिने =<br>रु.४४,४५,२९८/- |

वर नमतुद तुलनात्मक तक्ता पाहता ई-निविदाधारक ओम एन्टरप्रायजेस,पुणे यांचे दर सर्वात कमीचे म्हणजे ( प्रति कुशल ११ कामगार प्रति महिना रक्कम रु. ४०४११८ x ११ महिने = रु.४४,४५,२९८/-) ई निविदा रक्कमेतील सेवा शुल्क (सर्व्हिस चार्ज) कामगार पुरवठा करणे बाबतचे आलेले दर जास्तीचे वाटत असल्याने ई निविदाधारक ओम एन्टरप्रायजेस,पुणे यांना मनपा पत्र जा.क्रं/विद्युत/२४२ दि.३/१०/२०२५ अन्वये दर विश्लेषणा कामी कळविण्यात आले होते. प्रति दिवस

त्यानुसार ई निविदाधारक ओम एन्टरप्रायजेस,पुणे यांनी दर विश्लेषणाअंती खालीलप्रमाणे दर कमी करुन दिलेले असून त्या दरात काम करणेबाबत दि.०३/१०/२०२५ रोजी संमतीपत्र दिलेले आहे.

| अ.क्रं | ई निविदेतील दर | दर विश्लेषणाअंती कमी करुन दिलेले दर |
|---|---|---|
| १ | ई निविदा रक्कमेतील सेवा शुल्क (सर्व्हिस चार्ज) कामगार पुरवठा करणे बाबत रक्कम रु.८७ | ओम एन्टरप्रायजेस,पुणे यांनी ई निविदा रक्कमेतील सेवा शुल्क (सर्व्हिस चार्ज) कामगार पुरवठा करणे बाबतचे प्रति कामगार, प्रति दिन रक्कम रु.८७ पैकी रु.८६ दर कमी करुन दिलेले असून प्रस्तावित कामातील सेवा शुल्क (सर्व्हिस चार्ज) हे प्रति कामगार, प्रति दिन रक्कम रु.१ या दराप्रमाणे काम करणे बाबत संमती पत्र दिलेले आहे. |
| २ | प्रति कुशल ११ कामगार ११ महिन्या करीता<br>प्रति महिना रक्कम रु.४०४११८ x ११ महिने = रु.४४,४५,२९८/- | प्रति कुशल ११ कामगार ११ महिन्या करीता<br>प्रति महिना रक्कम रु.३७९५२२ x ११ महिने = रु.४१,७४,७४२/- |

वर नमुद केलेप्रमाणे खालीलप्रमाणे खर्च येईल.

| अ.क्र. | विवरण | कामगार संख्या | टक्केवारी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मुळवेतन | - | - | ५३८ |
| २ | विशेष भत्ता | - | - | ३३१ |
| | एकुण = मुळ वेतन + विशेष भत्ता | १ कामगार | | ८६९ |
| | GST 18% (प्रती कुशल कामगार) | | | १५६ |
| | एकुण | | | १०२५ |
| १ | भविष्य निर्वाह निधी | १ कामगार | १२.३६ % | १०७ |
| २ | ई.एस.आय.सी. | १ कामगार | ३.२५ % | २८ |
| ३ | बोनस | १ कामगार | ८.३३ % | ७२ |
| ४ | ग्रॅज्युईटी | १ कामगार | ४.०० % | ३५ |
| ५ | किरकोळ रजा | १ कामगार | १.०० % | ०९ |
| ६ | गणवेश / पावसाळी साहित्य वाटप करणे | १ कामगार | ४.०० % | ३५ |
| ७ | Workmen compention Insurance | १ कामगार | १.६७ % | १५ |
| ८ | सेवा शुल्क (सर्विस चार्ज) कामगार पुरवठा करणे बाबत | १ कामगार | | ०१ |
| | एकुण | | | १३२७ |

१० वायरमन व १ कनिष्ठ अभियंता कुशल कामगार A+B+C नुसार मक्तेदाराला अदा करण्यात येणारी रक्कम खालील प्रमाणे आहे.
११ कुशल कामगारांसाठी प्रति दिवस = रु. १४,५९७/-
प्रति महीना (२६ दिवस) = रु. ३,७९,५२२/-
११ महीने करीता = रु ४१,७४,७४२/-

| प्रति दिवस | प्रति महीना (२६ दिवस) | ११ महीने करीता |
|---|---|---|
| रु. . १४,५९७/- | रु. ३,७९,५२२/- | रु. ४१,७४,७४२/- |

वर नमुद केलेनुसार ई निविदाधारक ओम एन्टरप्रायजेस,पुणे यांचे दर विश्लेषणाअंतीचे दरानुसार सदर कामी १८% GST सह रक्कम रु.४१,७४,७४२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

वर नमुद केले प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षित खर्च रक्कम रु.४१,७४,७४२/- मात्रचा खर्च हा सन २०२५-२६ अंतर्गत कंत्राटी मजुर व वाहने व इतर साहित्य पुरवठा (बांधकाम विभाग) या लेखाशिर्षका अंतर्गत करावयाचा आहे. त्यानुसार लघुत्तम ई निविदाधारक ओम एन्टरप्रायजेस,पुणे यांचे दर विश्लेषणाअंतीचे कमी करुन दिलेले दर स्विकारणेस व या दरानुसार येणाऱ्या एकुण रक्कम रु.४१,७४,७४२/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी विदयुत विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेले १ कनिष्ठ अभियंता वगळून १० वायरमन हे बाह्यस्त्रोत पुरवठादार/मक्तेदार यांचेकडुन कुशल मनुष्यबळ पुरविणेस वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. सदर प्रकरणी आस्थापना विभागाचा अभिप्राय घेऊन पूढील कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:-३२२** **दिनांक :-१७/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/८१९/२०२५-२६ दि. १७/१०/२०२५
३. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा दि.०७/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०७/०८/२०२५ चा अभिप्राय.
५. निविदा समितीचा निर्णय.
६. आयुक्त यांचा दि.०७/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र. १२ अंतर्गत स.नं. ४७५ मध्ये प्रभाग समिती क्र. ०४ (गिरणाटाकी) येथे प्रशासकीय इमारत व वॉल कंपाऊड बांधणे कामी मक्तेदार श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. जळगाव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९०% कमीचे दर आल्याने सदर दरास मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र. १२ अंतर्गत स.नं. ४७५ मध्ये प्रभाग समिती क्र. ०४ (गिरणाटाकी) येथे प्रशासकीय इमारत व वॉल कंपाऊड बांधणे कामास प्रशासक / महासभा ठराव क्र. २९१ दि. १३/०६/२०२५ रोजीच्या मान्यतेने सदर कामाची ई-निविदा सूचना क्र. ६१७ मनपा सा.बा./जा.क्र./५३३ दि. १३/०८/२०२५ अन्वये सदर कामाची ई-निविदा दै. सकाळ व दै. द हिन्दु या वर्तमान पत्रात दि २७/०८/१०२४ रोजी ई-निविदा प्रसिद्ध केल्यानुसार संगणकाद्वारे निविदा भरणे करीता दि.१२/०८/२०२५ ते दि. ०२/०९/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मुदतीत एकुण ०६ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असून सदरचे आलेले बंद पाकीटापैकी लिफाफा नं. ०१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्याची विस्तृत छाननी लिपिक व संबंधीत शाखा अभियंता व पवडी लेखापाल यांचे कडून करण्यात आली असून त्या अनुषंगाने गोषवारा खालील प्रमाणे. परंतु (१) शासन निर्णय CAT/२०१७ प्र.क्र.०८/इ.मा.०२/मंत्रालय, मुंबई दि. २७/०९/२०१८ व (२) शासन निर्णय CAT २०१७ /प्र.क्र.८/इमा-२ दि. २०/०५/२०१९ चे शासन निर्णया नुसार (३) शासन निर्णय सकीर्ण २०२१/प्र.क्र.९८/ नवि-१६ दिनांक ०८ जुलै २०२१ अन्वये प्राप्त झालेल्या निविदा स्विकारण्यास निविदा समितीने मान्यता दिल्या नुसार दोन्ही निविदाधारक पात्र असल्याने दोन्ही निविदाधारक यांचे निविदा दराबाबतचे पाकीट क्र. ०२ उघडले असता त्यात आलेल्या दराबाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.न. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४.३६.२७,४९२- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | पराग बिल्डकॉन LLP Jalgoan | निविदा रक्कमेवर १०.००% जास्तीचे दर | ४.७९, ९०,२४१/- |
| २ | श्री श्री इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | निविदा रक्कमेवर ०.९९०% कमीचे दर | ४.३१. ९५,५७९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री श्री इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि, जळगाव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ०.९९०% कमीचे दर आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु ४.३१. ९५,५७९/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमूद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, रॉयल्टी यांच्या रक्कमा खालीलप्रमाणे समाविष्ट करावयाच्या आहेत.

| अ.न. | निविदा रक्कमेवर ०.९९०% कमी दरा प्रमाणे येणारा अपेक्षीत खर्च रक्कम | ४.३१.९५.५७९/- |
|---|---|---|
| १ | जि.एस.टी.१८% | ७७.७५,२०४/- |
| २ | कामगार विमा १% | ४,३१,९५६/- |
| ३ | रॉयल्टी | १,६८,२४८/- |
| ४ | टेस्टींग | २८,८९०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ५,१५,९९,८७७/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण अपेक्षीत खर्च रक्कम रु. ५,१५,९९,८७७/- मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. ५,१५,९९,८७७/- मात्र मनपा अर्थ संकल्प २०२५-२६ चे नविन इमारती / फायरस्टेशन व वार्ड ऑफिस बांधणे या लेखाशिर्षका खाली मंजूर झाले असल्याने सन २००२५-२६ वा वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री श्री इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि, मक्तेदार जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेवर ०.९९०% कमीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५५** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र.:-३२३** **दिनांक :- १७/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.पा.पु./४८ दि.१६/१०/२०२५ अन्वये पाणी पुरवठा विभागात जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी वितरण व्यवस्थे कामी मनुष्यबळ (३५(व्हॉलमन/मजूर) प्रती दिन) पुरविणे कामी मक्तेदार एस.के.कॉन्ट्रॅक्टर, जळगांव यांचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९३,०४,२९०/- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**